
# प्रफुल्लचंद्र

आचार्य प्रफुल्लचंद्र रे यांचें
जीवन-चित्र

[मूल्य ७ आणे.]

५



अमर ज्योति

वाङ्मय

## ' अमर ज्योति वाङ्मय '

(१) ५ डिसेंबर १९४३ च्या आमच्या योजना-पत्रकांत जाहीर केल्याप्रमाणें, प्रस्तुत (' ज्योति-सामंत-स्मारक ') संस्थेचा, दरवर्षी दिवाळींत धनत्रयोदशीच्या दिवशीं, एकाच गटांत, लहान मोठीं विविध वाङ्मयाचीं सर्वांग-सुंदर पुष्पें प्रकाशित करण्याचा संकल्प, आज या पहिल्या गटाच्या रूपानें मूर्त स्वरूपांत येत आहे.

(२) प्रत्यक्ष कार्याला अवधि फार थोडा; कागद-छपाई-महर्गता-नियंत्रणें इत्यादींची प्रतिकूल परिस्थिती; पण असल्या अनेक अडचणींतून वाट काढून, वर उल्लेखिलेल्या पत्रकांत कल्पिलेल्या एकूण अठरा पुष्पांपैकीं शेवटीं फक्त बारा पुष्पेंच कां होईनात, तेवढी तरी बालक-जगाला सादर करणें आम्हाला शक्य होत आहे. या बारा पुष्पांपैकीं (तीन पुष्पें थोडी अपूर्ण मुद्रित असल्यामुळें) आज धनत्रयोदशीला आम्ही फक्त नऊ पुष्पेंच प्रकट करीत आहों. तीं उरलेलीं तीन, ५ डिसेंबर १९४४ रोजीं आम्ही बाल-रसिकांच्या हातीं देऊं शकूं, अशी आम्हाला खात्री आहे.

आपल्यापुढें असलेल्या या पुष्पांचें चोखंदळ रसिक पालकांनीं एकदां अवलोकन केल्यावर—आपल्या बालकांना तीं सर्व दृष्टीनें फार आवडतील, त्यांना उद्बोधक व साहाय्यक होतील, अशी त्यांची खात्री होईल, यांत आम्हाला संदेह नाहीं.

(३) उगवत्या-वाढत्या पिढीला आनंद-ज्ञान-दायक असें नव्या दृष्टीचें, पद्धतशीर, सात्विक-सोज्वल आदर्श वाङ्मय, तज्ज्ञांकडून मुद्दाम लिहवून घेऊन उपलब्ध करून द्यावयाचें हा या स्मारक संस्थेचा मनोदय आहे. तो अधिक सुलभ व्हावा, म्हणून विषयपरत्वें ' मनोरंजक ' व ' ज्ञान ' असे आम्ही मुख्य दोन स्थूल विभाग कल्पिले आहेत वयपरत्वें-१) ' शिशुश्रेणी ' (वय वर्षे ७ पर्यंत), (२) बाल-श्रेणी ' (वय वर्षे १२ पर्यंत,) (३) 'किशोर श्रेणी ' (वय वर्षे १४,) व (४) 'कुमार-श्रेणी ' (वय वर्षे १७ पर्यंत) आम्ही सर्वसाधारण चढते टप्पे ठरवले आहेत. आणि याच विषय-विभागांच्या व वयाच्या-टप्प्यांच्या स्थूल आराखड्याचा अधिक सूक्ष्म विचार करून त्यांत बसणाऱ्या सर्व प्रकारच्या विविध आकर्षक पुस्तकांचा दरवर्षी होणाऱ्या आमच्या असल्या प्रकाशनगटांत समावेश होईल, अशी काळजी घेण्याचा आम्ही प्रयत्न करणार आहों.



# प्र फु ल्ल चं द्र

## [ आचार्य प्रफुल्लचंद्र रे ]

यांचें जीवन चित्र

— लेखक —

श्री. ना. गो. तवकर बी. ए. एस्. टी. सी
[ प्रिन्सिपॉल, 'दादर विद्यामंदिर' दादर, मुंबई. ]

रघुवीर सामंत संपादित

अमर
ज्योति वाङ्मय
[५]

मूल्य ७ आणे ] धनत्रयोदशी १८६६ [ प्रथमावृत्ति

**वाचक कुमार-कुमारीस—** ★ [ चरित्र-कथा-१ ]

माझे शिक्षणतज्ज्ञ स्नेही श्री. ना. गो. तवकर यांनीं, हळुवार व रसिक लेखणीनें चितारलेलें, आचार्य प्रफुल्लचंद्र रे यांचें हें जीवन-चित्र तुमच्या हातीं देतांना मला आनंद होत आहे, तुमच्याबद्दलच्या नैसर्गिक आवडीमुळें व वाटणाऱ्या कळकळीमुळेंच चरित्र-लेखनाच्या ओघांत लेखकानें मांडलेली स्वतःची मतें—विचार तुम्हालाही ग्राह्य वाटण्यासारखे आहेत. प्रफुल्लचंद्रांचें चरित्र तर प्रत्येक देशाभिमानी, महत्वाकांक्षी कुमार-कुमारीस उद्बोधक व दर्शक होईल. रविंद्रनाथ टागोरांनीं म्हटल्याप्रमाणें...प्रफुल्लचंद्र ' पुष्कळ झाले '...तुमच्यांच पिढीतून ते महत्वाकांक्षेनें वाढले, तर आपल्या मायभूमीचें दारिद्र्य-पारतंत्र्य धुक्याप्रमाणें विरून नाहीं का जाणार ?—

—त्या दृष्टीनें या जीवन--चित्राच्या वाचनाचा उपयोग करा.

तुमचा-संपादक—' अमर ज्योति वाङ्मय '

**पालकांस—** ★

आमच्या संस्थेमार्फत ' चरित्र-कथा ' या विभागातून आम्ही या पुस्तकाप्रमाणेंच सर्व थोर पुरुषांचीं जीवन-चित्रें, आपल्या मुलांमुलींसाठीं तयार करवून घेणार आहों. त्यांत आम्हाला आपलें सहकार्य पाहिजे आहे.

केवळ मनोरंजनाच्या पुस्तकांपेक्षां असल्या चरित्र वाङ्मयाचा मुलांच्या वाढत्या महत्वाकांक्षी मनावर अजाणता परिणाम होतो; त्यांच्या अंगांतील नैसर्गिक सुप्त कार्यशक्ती खुल्या होतात. या दृष्टीनें त्यांच्यापुढें मधून मधून असले आदर्श वेळींच ठेवणें जरूर असतें, हें आपल्यासारख्या सूज्ञांस मुद्दाम सांगण्याचें कारण नाहीं. तेव्हां असल्या पुस्तकांना मनोरंजनाच्या पुस्तकांइतकाच आश्रय मिळावयास पाहिजे.तरच या प्रकारच्या प्रकाशनांची वाढ होणार.

या दृष्टीनें आपला आश्रय जमेस धरून आम्हीं अशीं व अशा स्वरूपाची दुसरीं चरित्र-कथात्मक पुस्तकें प्रकाशनासाठीं तयार करीत आहों.

आपला नम्र-'संपादक.

---

[ सर्व हक्क प्रकाशका-स्वाधीन ]

—: मुद्रक :—
**अनंत वा. देसाई**, एम्. ए.
लीयल प्रिंटिंग प्रेस,
१३-१९ हमाम स्ट्रीट,
फोर्ट, मुंबई.

—: प्रकाशक :—
सौ. **स्नेहल सामंत**, पी. ए.
चालक, 'अमर ज्योति प्रकाशन'
१४ बी. हरजीवनदास एस्टेट
व्हिन्सेन्ट रोड : दादर :
मुंबई १४.

# आचार्य प्रफुल्लचंद्र रे.

## १ भूमिका.

सूर्य उदयास येतो, दुपारी जास्त तेजस्वी होतो, सायंकाळीं पुनः तो क्षीण होतो. व नंतर रात्रौ नाहींसा होतो; पण सकाळीं पुनः उगवतो. हें रहाटगाडगें दररोज चालूं असतें. जगांत प्रत्येक वस्तूचीं हीं स्थित्यंतरें होतात; व एकसारखीं रहाटगाडग्याप्रमाणें त्यांची चढ-उतर चालूं असते. मनुष्याच्या व देशांच्याही बाबतींत अशीच 'चढ-उतर' पहावयास मिळते.

कांहीं शतकांपूर्वीं अमेरिकेचें अगदीं नांवहीं कोणास माहीत नव्हतें. अंधारांत असलेला तो अमेरिकाखंड नुसता उदयासच आला असें नाहीं, तर आज त्याचें तेज सर्व जगभर कसें पडलें आहे हें आपणां सर्वांस माहीत आहे. हें दृश्य आपल्याला बोधप्रद नव्हे काय ?—

ज्यावेळीं हिंदुस्थान सुधारणेच्या अत्युच्च शिखरावर होता, त्यावेळीं इंग्लंड वगैरे राष्ट्रें पूर्ण जंगली स्थितींत होतीं. परंतु लवकरच पूर्वेकडचा सूर्य पश्चिमेकडे जाऊं लागला; पश्चिमेकडील देश दिवसेंदिवस उदयास येऊं लागले व आशियाखंडावर अंधार पडूं लागला. पण ही जाणीव आपल्याला नव्या कार्यास, नव्या प्रयत्नास उद्युक्त करील, तरच आपल्या जन्माचें सार्थक !

या अज्ञानांधकारानें आपणांस आतांपर्यंत घेरलें होतें. खरेंच; परंतु चाकाच्या धांवेप्रमाणें कोणतीही स्थिती स्थिर नसते. एकसारखी खाली-

वर होते; त्यामुळेंच पूर्वेकडे आतां पुनः ज्ञानरवि उदयास येण्याची सुचिन्हें दिसूं लागलीं आहेत. समाधानाचीच गोष्ट आहे. अतिपूर्वेकडील जपान तर ज्ञानाच्या बाबतींत पाश्चिमात्यांची बरोबरी करूं लागला आहेच; पण चीनवर व आपल्या हिंदुस्थानवरही लवकरच ज्ञानरवि आपली कृपादृष्टी वळवील, अशी स्पष्ट चिन्हें दिसूं लागलीं आहेत. मनें आशावंत ठेऊन, अनुदिन अधिकाधिक जोरकस प्रयत्न झालेच पाहिजेत.

– २ –

"हिंदुस्थानच्या प्रभातकालाला चांगलीच सुरवात झाली आहे!" हें शुक्राप्रमाणें अत्यंत तेजस्वी तारे या देशांत उदयास येत आहेत, यावरूनच सिद्ध होत आहे. हे अतितेजस्वी तारे हिंदुस्थानच्या सर्वच भागांत एकामागून एक उदयास येऊन गेले आहेत, येऊं लागले आहेत.

सर रामन्, विश्वेश्वरय्या, गोखले, टिळक, गांधी, स्वामी रामतीर्थ, लाला लजपतराय, नेहरू पिता-पुत्र, राममोहन राय, रविन्द्रनाथ टागोर स्वामी विवेकानन्द, सर जगदीशचंद्र बोस, आचार्य रे, बाबु राजेन्द्रप्रसाद—एक ना दोन,....किती तारे जन्मास आले आहेत व येत आहेत! या सर्व ताऱ्यांनीं, आपला प्रकाश हिंदुस्थानच्या बाहेर—सर्व जगभर—पसरविला आहे.

वरीलपैकीं एकही व्यक्ति प्रांतीय गणली जात नाहीं; ती भारतीयच मानली जात आहे; तरी पण ज्या ज्या प्रांतांत त्या व्यक्ति जन्मास आल्या त्या प्रांतांनाहीं त्यांनीं विशेष महत्व प्राप्त करून दिलें आहे.

सर रामन् वगैरेंनीं मद्रास प्रांताला शोभा आणली; तर टिळक—गोखल्यांनीं महाराष्ट्राचें नांव उज्ज्वल केलें. महात्मा गांधींनीं गुजराथला शहाणे करून सोडलें; (ते तर सर्व जगाचाच विषय होऊन बसले आहेत.) लाला लजपतराय 'पंजाबचा सिंह' ठरले. खान अब्दुल गफारखान वायव्य प्रांतांत 'दुसरे गांधी' म्हणूनच प्रसिद्ध झाले आहेत. टागोरादि



असंख्य बंगप्रांतीयांनीं तर बंगालला प्रतिभासंपन्नांची जन्मभूमि, कर्मयोग्यांची कर्मभूमि व दधीचि ऋषींनाही मागें टाकणाऱ्या त्यागमूर्तींची त्यागभूमि ठरविली आहे. याप्रमाणें हिंदुस्थानच्या प्रत्येक भागांत कोणी ना कोणी थोर पुरुष चमकत आहे.

– ३ –

आपल्या चरित्र नायकाचा जन्म बंगालांत झाला. हा वंगप्रांत अनेक प्रकारें इतका संपन्न आहे, कीं, प्रत्येकास वाटावें त्या प्रांतांतच आपण जन्मास यावें.

कारण, तेथेंच जगास दिपविणारे टागोरांसारखे द्रष्टे जन्मास येऊन चिरंजीव वाङ्मय उत्पन्न करून गेले. (त्यांनीं 'नोबेल–प्राइज' सारखे जगांतील पहिल्या नंबरचें बक्षीस मिळविलें.) सर जगदीशचंद्र बोस व सर प्रफुल्लचंद्र रे यांच्यासारखे शास्त्रज्ञ येथेंच होऊन गेले; देशाकरितां आत्मयज्ञ करणारे, अचाट कृत्यें करणारे व निःसीम देशसेवा करणारे वीर, बंगालइतके दुसऱ्या कोणत्या प्रांतानें अलीकडल्या कालांत उत्पन्न केले आहेत? राजकारणांत पुढारपणही या प्रांतानें थोडें थोडकें घेतलें नाहीं. या प्रांतांतच जगांतील कांहीं श्रेष्ठ उद्योगधंदे आहेत. हिंदुस्थानांतील दुसरा कोणता प्रांत या प्रांताइतका संपन्न आहे? हिंदुस्थनांतील अत्यंत पवित्र नदी जी भागिरथी, ती याच प्रांताला पुनीत करते; व हिंदुस्थानास अत्यंत पवित्र व उपकारक, त्याचप्रमाणें जगांत पहिलें स्थान पटकविणारा हिमालय, याच प्रांताच्या उत्तरेस, त्याला छायादायक झाला आहे.

– ४ –

हिमालयाच्या डोंगरांवरून वाहात येणाऱ्या नद्यांनीं आणलेल्या मातीनें लगतचा समुद्र भरून टाकला व तेथेंच एक सपाट मैदान तयार झालें.

या सुंदर प्रदेशाचा असा मनोरंजक इतिहास आहे. हजारों मैलांवर आपणांस एक डोंगर दिसणार नाहीं किंवा एकादी टेकडी दिसणार नाहीं. जिकडे पहावें तिकडे हिरवागार प्रदेश. जमीनही समुद्राकडे सावकाश कलत गेलेली आहे. हा प्रदेश नदीच्या गाळामुळें तयार झाला असल्यामुळें, तो असा फारच सुपीक असला तर त्यांत आश्चर्य नाहीं.

असा हा धनधान्यांनीं सुपीक प्रदेश थोरथोर लोकांनींही समृद्ध असल्यास नवल काय ?

प्रफुल्लचंद्र रे हे असेच एक थोर सद्गृहस्थ होऊन गेले.

या प्रांतांत सर रे यांचा जन्म झाल्यानें त्यांनाही किती धन्यता वाटत असेल ?

कारण, ' वंदे मातरम्, सुजलाम्, सुफलाम्' हें राष्ट्र गीतही याच प्रांतांत जन्मास आलें.

———

## २ जन्म व बालपण.

– ५ –

अशा या बंगाल्यांतील एक खेडें; इ. सन १८६१ सालीं प्रफुल्लचंद्रांचा जन्म झाला.

प्रफुल्लचन्द्रांचे वडील बंगाल्यांतील एक सुखवस्तु जमीनदार; तेव्हां लहानपणीं प्रफुल्लचंद्रास फार मजेत दिवस घालवितां आले असले पाहिजेत. त्यांची नेहमींची सहज हास्यमुद्रा ही गोष्टच सिद्ध करते.

जगांतील कोणत्याहीं गोष्टीच्या पूर्ण व योग्य वाढीला अनुकूल वातावरणाची अत्यंत आवश्यकता असते. प्रफुल्लचंद्रांना लहानपणापासून उत्तम प्रकारचें वातावरण प्राप्त झालें होतें; आणि हें एक त्यांचें व देशाचें नशीबच म्हटलें पाहिजे. ( सर चंद्रशेखर वेङ्कट रामन् व सर जगदीशचंद्र बोस यांच्या प्रमाणेंच ) प्रफुल्लचंद्र यांची पूर्वभूमिका तयार करणारे असेच त्यांचे वडील होते.



प्रफुल्लचंद्रांचे वडील जरी जमीनदार होते, तरी त्यांची वृत्ति जमीनदाराची नव्हती. ते एक समतावादी होते. आपणांस जें कांहीं मिळतें त्याचा इतरांसहीउपयोग व्हावा,असें त्यांचें मत होतें व त्याप्रमाणें त्याची वागणूक होती. त्यांनीं केव्हांही चैनींत पैसे घालविले नाहींत; द्रव्याचा उपयोग गरीब लोकांकरितां त्यांनीं केला. कित्येक वेळां यामुळें ते कर्जबाजारीही झाले; व त्याचेंच फळ प्रफुल्लचंद्रांस भोगावें लागलें.

बाबु हरीशचंद्र हे एक मोठे विद्वान् गृहस्थ होते. त्यांचें इंग्लिश व फारसी भाषेवर प्रभुत्व होतें. त्यांच्या मनावर पाश्चात्य संस्कृतीचा फारच परिणाम झाला होता; व आपल्या लहानग्या प्रफुल्लासही या वेळेपासूनच त्यांनीं स्वतंत्र विचार करावयास शिकविलें होतें. त्यांना विशेष तळमळ देशाच्या उद्धाराकरितां लागून राहिलेली होती; व त्याकरितां तनमनधन अर्पण करून मनोभावें झटण्यास ते तयार होते. आपल्या गरीब अशिक्षित बांधवांस सुशिक्षित करावयास पाहिजे, म्हणून स्वतःच्या खर्चानें त्यांनीं आपल्या गांवीं एक शाळा काढली होती. आपल्या राहत्या जागेचा उपयोगही त्यांनीं या शाळेकरितां होऊं दिला होता.

– ६ –

अशा ' गुरु 'च्या प्रत्यक्ष देखरेखीखालीं बाळ प्रफुल्लाचें आरंभीचें शिक्षण झालें. दुसरा कोणताही शिक्षक आईबापांइतका ' गुरु ' होऊं शकत नाहीं; त्यांतून शिकलेले आईबाप असलेत्तर विचारावयासच नको. हरीशबाबु तर नुसते ध्येयवादी नसून प्रत्यक्ष कृति करणारे होते. अशा वडिलांच्या तालमेंत तयार झालेला " प्रफुल्ल " इतका थोर निघाल्यास आश्चर्य नाहीं !

प्रफुल्लचंद्रांना त्यांच्या वडिलांनीं आपण काढलेल्या शाळेंत दाखल केलें. तेथें ते नऊ वर्षांचे होईपर्यंत राहिले. पुढें जास्त शिक्षण घेण्या-

करितां त्यांना कलकत्त्यास पाठविण्याचें नक्की झालें; व इ. स. १८७० सालीं हेअर हायस्कूलमध्यें त्यांना दाखल करण्यांत आलें. परंतु त्यांची प्रकृति कलकत्त्यास बरी राहीना; म्हणून इ. स. १८७४ सालीं त्यांना शाळा सोडावी लागली; व ते पुनः आपल्या वडिलांच्या खेडेगांवीं प्रकृति सुधारण्यास आले. दोन वर्षेंपर्यंत त्यांना येथें घालवावीं लागलीं; तेव्हां कोठें त्यांची प्रकृति बरी झाली.

– ७ –

मुलें जर आजारी पडलीं तर तीं आपला वेळ कसा घालवतील? नुसतें अंथरुणांत निजून तर त्यांना कंटाळा येईल. कदाचित् आपल्या भावंडां-बरोबर किंवा नोकरांबरोबर पत्ते खेळण्यांत किंवा इतर खेळ खेळण्यांत तीं वेळ घालवतील! नाहीं? फार फार तर तीं कांहीं गोष्टींचीं पुस्तकें वाच-तील; त्यांचा स्वभाव मात्र फार चिडखोर होईल. त्यांचें सर्व लक्ष खाण्याकडे जाईल. नुसतीं फळें खाऊन त्यांचें समाधान होणार नाहीं. तीं आईजवळ निरनिराळे हट्ट धरून बसतील; रुसतील; फुगतील व त्यांचा वेळ जितका आनंदांत जावयाला पाहिजे तितका कधींच जाणार नाहीं.

प्रफुल्लचंद्रांनीं आपले आजाराचे दिवस असेच घालविले असतील असें कोणालाही वाटेल. कारण वास्तविक ते त्यावेळी १२।१३ वर्षांचे होते.

– ८ –

पण मुलाचे पाय पाळण्यांत ओळखावे. इतक्या लहान वयात त्यांनीं विचार केला—"माझे आजाराचे दिवस कोणतें चांगलें काम करून मी घालवूं?"—आजारामुळें त्यांना दुसरें कोणतेंही काम करतां येण्या-जोगें नव्हतें; त्यांना वाटलें, "शाळा नाहीं तर नाहीं; आपण शाळेंतलें वाचन बंद कां ठेवा? निजूनही वाचतां येतेंच. यांत मेहनतही नाहीं."



असा विचार करून, कोणतीं पुस्तकें वाचून काढावयाचीं याचा त्यांनीं बेत केला व वडिलांच्या लायब्ररींतील सर्व पुस्तकें वाचून काढावयाचीं, असें त्यांनीं ठरविलें. शाळेच्या सर्व आयुष्यांत दुसऱ्या एखाद्याला याच्या निम्मीं पुस्तकेंही वाचून काढतां आलीं नसतीं!

आजाराच्या दोन वर्षांच्या अवधींत वडिलांचा सर्व ग्रंथसंग्रहालय त्यांनीं पालथा घातला व ते सुविद्य बनले. या वाचनांतल्या "चेंबर्स बाया-ग्राफी"नें त्यांच्या मनावर चांगलाच परिणाम केला. विशेषतः, गॅलिलियो, न्यूटन, बेंजामीन फ्रांकलीन, यांच्या चरित्रांनीं तर त्यांच्या मनावर इतकी जोराची पकड बसविली, कीं, तीं चरित्रें त्यांनीं पुनः पुनः वाचून काढलीं.

हीं चरित्रें वाचून त्यांना पुष्कळच गोष्टी शिकावयास मिळाल्या. आपलें काम सिद्धीस न्यावयाचें असलें, तर भरपूर श्रम करावयास पाहि जेत. प्रत्येक कामांत नियमितपणा पाळला पाहिजे. व आपण अगदीं साधेपणानें राहिलें पाहिजे.

आचार्य रे यांच्या चरित्रांत या तीनही गोष्टी पहावयास मिळतात.

## ३ शिक्षण.

– ९ –

आपल्या आजारीपणाचा फायदा प्रफुल्लचंद्रांनीं जितका करून घेतला, तितका इतर कोणी क्वचितच करून घेतला असेल. वाईटांतून चांगलें काढण्याची प्रवृत्ति फारच थोड्याच्या बाबतींत दिसून येतें.

त्यांची प्रकृति आतां चांगली झाली व त्यांनीं पुनः कलकत्त्यास जाण्याची तयारी केली. कलकत्यास ते आल्बर्ट हायस्कूलमध्यें आतां दाखल झाले. इतकें वाचन झालेला विद्यार्थी इतर मुलांपेक्षां हुशार ठर-

त्यास नवल नाहीं. एक अत्यंत हुशार विद्यार्थी म्हणून ते गणले जाऊं लागले. शेवटीं, या शाळेंतूनच ते १८७९ सालीं प्रवेश परीक्षा पास झाले.

या मधल्या काळांतही त्यांचें वाचन अखंड चालूंच होतें. त्यांनीं मिळतील तितकीं इंग्लिश व बंगाली पुस्तकें वाचलीं. लॅटिनचाही अभ्यास सुरू केला व त्यांतील ग्रंथांचें वाचन सुरू केलें. ते वर्तमानपत्रेंही वाचूं लागले. त्यामुळें पुस्तकाबाहेरील जगाशी त्यांचा दाट परिचय होऊं लागला. पुष्कळ हुशार विद्यार्थ्यांप्रमाणें ते एक केवळ 'पुस्तकांतला किडा' म्हणूनच राहिले नाहींत.

प्रफुल्लचंद्रांसारखे विद्यार्थी विशाल बुद्धीचे असतात. ते चोहों-बाजूंनीं विचार करतात व नंतरच एकादी गोष्ट करण्याचें ठरवितात. प्रफुल्लचंद्रांनीं पाहिलें, कीं, आपली शरीरप्रकृति बरी नसते. व ती निसर्गतःच तशी राहण्याचा संभव आहे; तरी ती जास्त बिघडणार नाहीं व आपल्या कार्याच्या आड येणार नाहीं, अशी काळजी घेतली पाहिजे; याला एकच उपाय, म्हणजे नियमित व्यायाम घ्यावयास पाहिजे. '**निरोगी शरीर तर निरोगी मन,**' हें तत्त्व त्यांना माहीत होतें. तेंच त्यांनीं अमलांत आणलें. म्हणून ते आतां नियमित फिरावयास जाऊं लागले; शक्तीचा इतर कसरती व्यायाम होत नसेल, तर निदान नियमित फिरावयास जावयास पाहिजे, ही गोष्ट त्यांना विद्यार्थीदशेंतही चांगली पटली होती.

पण प्रफुल्लचंद्र नुसते फिरावयासच जाऊन थांबले नाहींत; ते पोहण्यास शिकले, व नौकेंतून जलविहारही करूं लागले. ते आतां शाळेच्या बाहेरील जगांत विशेष वापरूं लागले. चांगल्या चांगल्या व्याख्यानांस जाऊं लागले. अशा प्रकारें शाळेंतील शिक्षण, इतर वाचन, समाजांत वावरणें, यामुळें त्यांचें मन मोठें बनत चाललें.

– १० –

त्यावेळीं, बंगालांत ब्राह्मोसमाजामध्यें व्याख्यानें होत, तीं त्यांस विशेष आवडत; त्यांतल्या त्यांत बाबू केशवचंद्र सेन यांच्या व्याख्यानांचा



प्रफुल्लचंद्रांवर चांगलाच परिणाम होऊं लागला. लोकसेवाव्रत पत्करणें हें केशवचंद्रांच्या व्याख्यानांचें ध्रुवपद असे. या व्रताचें बाळकडु प्रफुल्लांना त्यांच्या वडिलांकडून आधीं मिळालें होतेंच. त्यांत या व्याख्यानांची भर पडली. लवकरच प्रफुल्लचंद्र ब्राह्मोसमाजाचे सभासद झाले.

याच सुमारास त्यांच्या वाचनांत "वंदेमातरम्" या गीताचे कर्ते बंकीमचंद्र चतर्जी यांच्या कादंबऱ्या आल्या. बाबु सुरेन्द्रनाथ बानर्जी व बाबु आनंदमोहन बोस यांच्या प्रभावी विचारांचाही परिणाम त्यांच्या मनावर होऊं लागला. त्यांना देशसेवा व समाजसेवा करण्याची दिशा मिळाली. त्या कार्यासाठीं त्यांची मनोभूमिका पक्की तयार झाली.

प्रवेश परीक्षा पास झाल्याबरोबर त्यांनीं पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर यांनीं स्थापलेल्या "मेट्रोपोलिटन इन्स्टिटयूशन" मध्यें प्रवेश केला. या कॉलेजांत नांव घालण्यास दोन कारणें होतीं. एक तर पंडित ईश्वरचंद्रांचा त्या कॉलेजशीं संबंध. पंडित ईश्वरचंद्र बंगालमध्यें अत्यंत थोर पंडित होऊन गेले. तेव्हां त्यांनीं स्थापलेल्या कॉलेजमध्यें प्रवेश मिळावा म्हणून कोणास वाटणार नाहीं? शिवाय दुसरेंही एक कारण होतें. या कॉलेजांत बाबु सुरेन्द्रनाथ बानर्जी शिकवित असत. त्यांचीं व्याख्यानें प्रफुल्लचंद्रांना फारच आवडत.

या कॉलेजमध्यें असतांनाच त्यांना कलकत्ता प्रेसिडेन्सी कॉलेज मध्यें होत असलेलीं प्रसिद्ध आंग्ल शास्त्रज्ञ सर. ॲलेक्झँडर पेडलर व सर जॉन इलियट यांचीं शास्त्रीय विषयांवरील व्याख्यानें ऐकण्याचीहि सुवर्ण संधि प्राप्त झाली. या व्याख्यानांमुळें त्यांचें मन शास्त्रीय विषयांच्या अभ्यासाकडे झुकूं लागलें. ते लहान लहान प्रयोग करूं लागले; पण त्यांचें समाधान होईना. त्यांना वाटे,–'हें ज्ञान उत्तम प्रकारें शिकावयाचें असेल तर परदेशींच जावयास पाहिजे.'

– ११ –

येथपासून परदेशीं जाण्याची त्यांना फारच तळमळ लागून राहिली; पण परदेशी जावयाचें कसें? पैसा पाहिजे! वडिलांचा पैसा तर लोकसेवेंतच खर्च झालेला; त्यांना कांहीं कर्जही झालें होतें. पण अशा स्थितींतही त्यांनीं आपला धीर खचूं दिला नाहीं. **मनाचा निश्चयच झाल्यावर अशक्य काय आहे?** त्यांनीं आपल्या कोषांत 'अशक्य' या कल्पनेला थारा द्यावयाचा नाहीं, असें जणूं ठरवून टाकलें.

लगेच त्यांनीं एक युक्ति शोधून काढली. त्यावेळीं, परदेशीं जाणाऱ्या उत्तम प्रकारच्या विद्यार्थ्याला एक 'गिलक्राइस्ट' नांवाची शिष्यवृत्ति देण्यांत येत असे. ही शिष्यवृत्ति त्यांनीं मिळविण्याचें ठरविलें. पण त्याकरितां परीक्षा असत. त्यांत पहिला नंबर यावा लागे. त्याकरितां कसून अभ्यास करावयास पाहिजे होता.

थोर लोक नुसती बडबड करीत नाहींत, किंवा उगाच बढाई मारीत नाहींत; ते कृतीनेंच बोलतात. प्रफुल्लबाबूंनीं सुद्धां मनांतली ही गोष्ट कोणासही कळूं न देतां अभ्यासास जोरानें सुरवात केली; व अखेर त्यांनीं १८८२ सालीं ही शिष्यवृत्ति मिळविली.

झालें. शिष्यवृत्ति मिळाल्याबरोबर त्यांची इच्छा सफळ होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. परदेशला जाण्याची त्यांनीं तयारी सुरू केली व ते इंग्लंडला जाण्याकरितां निघाले. तत्पूर्वी त्यांनीं तेथील रीतिरिवाजांची चांगली माहिती करून घेतली. त्यामुळें तिकडे गेल्यावर त्यांना चुकलें चुकलेंसें वाटलें नाहीं.



# ४ विलायती सफर व उच्च शिक्षण.

– १२ –

प्रफुल्लचंद्र पहिल्यानें लंडनला गेले. तेथून नंतर ते एडिनबरोला गेले. आतां त्यांनीं स्कॉटलंडच्या राजधानींतील प्रसिद्ध विश्वविद्यालयांत आपलें नांव दाखल केलें.

या ठिकाणीं त्यांनीं सहा वर्षें काढलीं. पहिल्यानें आपण कोणता विषय घ्यावा हें त्यांचें ठरेना. पण पूर्ण विचारांतीं, देशप्रेमानें त्यांच्या मनांत उचल खाल्ली. हिंदुस्थानचा उद्धार शास्त्रीय ज्ञानानेंच होईल, असें त्यांचें मन त्यांना म्हणूं लागलें. शास्त्रीय ज्ञानाच्या सहाय्यानें मोठमोठे कारखाने काढले पाहिजेत व हिंदुस्थानचें दारिद्र्य नाहींसें केलें पाहिजे, असें त्यांना वाटूं लागलें. तेव्हां असे कारखाने काढण्यास पोषक अशा शास्त्रीय ज्ञानाचें शिक्षण घेण्याचें त्यांनीं निश्चित केलें. व बी. एस्. सी. चा अभ्यास त्यांनीं सुरू केला.

पण नुसता शास्त्रीय विषयच त्यांनीं अभ्यासिला नाहीं, असें एक दोन गोष्टींवरून दिसतें. मुख्य वेळ शास्त्रीय ज्ञानाच्या अभ्यासांत घालवावयाचा; रिकामा वेळ इतर उपयुक्त ज्ञानांत घालवावयाचा, असें त्यांनीं ठरविलें असावें.

– १३ –

कारण, याच सुमारास "बंडापूर्वीचें व नंतरचें हिंदुस्थान" या विषयावर इंग्लंडमध्यें निबंध मागवण्यांत आलें. या निबंधाकरितां चांगलेंच बक्षीसही लावण्यांत आलें होतें. हा निबंध आपण लिहावयाचा असें ठरवून त्यांनीं तो लिहावयास घेतला. निबंध तयार झाल्यावर तो पाठवून देण्यांत आला. या निबंधांत त्यांना पहिलें बक्षीस मिळालें असतें, पण त्यांनीं या निबंधांत ब्रिटिशसरकारावर चांगलीच कडक टीका केली होती. तरीसुद्धां तो दुसरा उत्कृष्ट निबंध ठरला.

प्रफुल्लचंद्रांना जरी बक्षीस मिळालें नाहीं तरी त्या निबंधानें त्यांना एका गोष्टीची चांगलीच जाणीव करून दिली. ती म्हणजे आपण उत्कृष्ट प्रकारें लिहूं शकतों ही होय. अर्थात् इतका उत्कृष्ट निबंध लिहण्यास त्यांना तत्पूर्वी केलेल्या अखंड वाचनामुळें चांगलाच फायदा झाला.

– १४ –

बी. एस्‌सी. ची परीक्षा चांगल्याप्रकारें पास झाल्यानंतर, पुढची म्हणजे डी. एस्‌सी. ची परीक्षा द्यावयाचें त्यांनीं ठरविलें. त्याकरितां त्यांना कसून प्रयोग करावे लागत. हे प्रयोग करीत असतां तेथील प्रोफेसरांना त्यांच्याबद्दल कौतुक वाटे व हा कोणी तरी महान् पुरुष होणार असें त्यांचें मन त्यांना सांगूं लागे. इ.स. १८८८ सालीं ते डी. एस्सी.–डॉक्टर ऑफ् सायन्स–ही परीक्षा पास झाले व त्यांना दोन शिष्यवृत्त्याही मिळाल्या. त्यांत त्यांना एक ‘ होप प्राइज ’ नांवाची शिष्यवृत्ती मिळाली.

डॉक्टरची पदवी मिळविल्यानंतर, ते पुन: आपल्या प्रिय मायभूमीस येण्यास निघाले. इतके उच्च शिक्षण घेतल्यानंतर कोठल्या तरी कॉलेजमध्यें ते प्रोफेसर होणार हें नक्की होतें. त्यांना विलायतेहून चांगलीं प्रशस्तिपत्रें व शिफारसपत्रेंही मिळालीं होतीं; तेव्हां नोकरी मिळणें कांहीं कठिण नव्हतें; त्यांतून पुन: त्यांनीं परदेशीं नांवलौकिकही मिळविला होता.

– १५ –

हिंदुस्थानांत आल्यावर, बंगाल शिक्षणखात्याच्या मुख्याधिकाऱ्यांकडे ते नोकरी मागण्यास गेले. वास्तविक उच्च पदवी असल्यावर त्यांना प्रोफेसर म्हणून घेण्यास कोणतीच हरकत नव्हती. पण त्यांनीं इंग्लंडमध्यें लिहिलेल्या निबंधामुळें म्हणा किंवा अन्य कोणत्या कारणामुळें म्हणा, त्यांना ती जागा मिळाली नाहीं. उलट, त्या शिक्षणाधिकाऱ्यानें त्यांना म्हटलें, “ तुम्ही जर इतके हुशार आहांत. तर नोकरीच्या मागें कां लागतां ? उद्योगधंदे कां काढीत नाहीं ? ”



उद्योगधंदा काढण्यास मोठें भांडवल लागतें, हें त्या बेट्यास माहीत नव्हतें, असें नाहीं. पण हें सर्व उपरोधिक बोलणें होतें.

शेवटीं, त्यांना ॲसिस्टंट प्रोफेसरची जागा ( प्रेसिडेन्सी कॉलेजमध्यें ) देण्यांत आली. त्यांची आतां २५० रुपयांवर नेमणूक झाली होती. मनांत प्रफुल्लचंद्रांना फार फार अपमान वाटला. पण करतात काय ? कित्येक वेळां असला अपमान निमूटपणें गिळावा लागतो. त्यांना नोकरी करणें आवश्यकच होतें. कारण यामुळें कांहीं पैसा सांठवून त्यांना लहानसा उद्योगधंदा सुरूं करावयाचा होता.

त्या शिक्षणाधिकाऱ्याला त्यांना दाखवावयाचें होतें, कीं, ‘ मीहि एक चांगलाच उद्योगधंदा काढणार आहे !’

## ५ कामास सुरवात व शोध.

– १६ –

प्रोफेसर झाल्यानंतर प्रफुल्लचंद्रांना पुष्कळ काम पडे. पण हें काम ठराविक सांच्याचें होतें. कॉलेजमधील ठराविक वर्ग घ्यावयाचा, ठराविक विषय शिकवावयाचा व ठराविक प्रयोग करून घ्यावयाचे. हें रोजचेंच काम करण्यानें देशाचा काय उद्धार होणार ? नुसतें मुलांस शिकवून कांहीं देशाचें पाऊल पुढें पडणार नाहीं.

प्रफुल्लचंद्रांनीं याच्यावर पुष्कळ विचार केला असला पाहिजे, त्यांना तर मोठा उद्योगधंदा सुरूं करावयाचा होता. उद्योगधंद्याला पाहिजेत हजारों रुपये. त्यांना मिळत होते अवघे २५० रुपये. त्यांतून वडिलांचें कर्ज फेडण्यांत कांहीं पैसा जाई; कांहीं पैसा गरीब विद्यार्थ्यांस मदत करण्यांत जाई; कांहीं पैसा त्यांच्या उपजीविकेकरितां खर्च करावा

लागे. इतकें करून शिल्लक कितीसा पैसा राहणार? तरीसुद्धां चार वर्षात त्यांनीं ८०० रुपये जमविले.

— १७ —

थोर माणसें कोणत्याही संकटाची पर्वा करीत नाहींत. त्यांच्यापुढें एकच ध्येय असतें व तें सिद्धीस नेण्याकरितां ते अटोकाट प्रयत्न करीत असतात. त्यांना रात्रंदिवस मेहनत करावी लागते; तरी ते कंटाळत नाहींत; किंवा एखादी सबब पुढें करीत नाहींत. वेळेचा जराही दुरुपयोग करावयाचा नाहीं; रिकाम्या वेळींही आपलें उद्दिष्ट साधेल असें काम करीत रहावयाचें, हेंच त्यांना माहीत असतें. ( डॉ. भिसे नाहीं का शक्य नसतांना इंग्लंडला गेले. तेथें त्यांनीं महत्वाचे शोध केले; पण तेथील लोकांची स्वार्थी दृष्टी पाहिल्यावर ते अमेरिकेंत गेले; व तेथें शेवटच्या क्षणापर्यंत त्यांनीं शोध लावले. सर रामन् हे शिरले अकौन्ट खात्यांत; सरकारी नोकरी; तीही जबाबदारीची; त्यांतून निरनिराळ्या ठिकाणीं बदल्या; असें असतांना, खासगी रीतीनें प्रयोग करून, त्यांनीं हिंदुस्थानचें नांव अत्युच्च शिखराला नेऊन ठेवलें. )

प्रफुल्लचंद्रांनीं सुद्धां या आठशें रुपयांत प्रचंड कारखान्याची मुहूर्तमेढ रोवावयाचें ठरविलें. कोणी म्हणेल ८०० रुपयांत कां कोठें कारखाना निघतो? व त्यानें हिंदुस्थानचें दारिद्र्य दूर होतें? पण प्रफुल्लचंद्रांनीं ही गोष्ट कशी साध्य केली हेंच आपल्याला आतां पहावयाचें आहे.

— १८ —

पहिल्यानें प्रफुल्लचंद्रांनीं आपल्या एका मित्राच्या सहाय्यानें एक खासगी प्रयोगशाळा सुरू केली. येथें ते एकसारखे प्रयोग करूं लागले. हे प्रयोग सतत चालू असतां, त्यांना एक महत्वाचा शोध लागला.

एका गोष्टीचा शोध लावावयास किती तरी प्रयोग करावे लागतात. पुष्कळ प्रयोगांचे श्रम तर अगदीं व्यर्थ जातात. शेवटीं वाटतें, 'झालें! आतां आपलें कांहीं चालत नाहीं; आपणांस पाहिजे तो शोध कांहीं लागणार नाहीं.' मनुष्य निराश होतो, व हातचें काम सोडून द्यावें कीं काय, म्हणून विचारांत असतो; अशा वेळीं जो नेटानें काम करतो, धीर सोडत नाहीं, त्याचाच अखेरचा प्रयोग सिद्धीस जातो; विजयाची माळ त्याच्याच गळ्यांत पडते.



प्रफुल्लचंद्रांचेही अनेक प्रयोग फुकट गेले असतील. पण शेवटीं जो शोध लागला तो अद्वितीय ठरला. हा शोध म्हणजे पारा व नैट्रिक ॲसिड् यांचें विशिष्ट पद्धतीचें एकीकरण होय. हा शोध लावण्याचा प्रयत्न १९ व्या शतकापासून युरोपांत चालला होता. पण तो शोध लागावयास ५।६ शतकें लागलीं; व तोही लागला हिंदुस्थानांतील एका ॲसिस्टन्ट प्रोफेसराच्या हातून! त्याच्या खासगी लहानशा प्रयोगशाळेंत!

हा शोध लागल्याबरोबर सर्व जग आश्चर्यानें थक्क झालें! सर्व मोठमोठ्या शास्त्रज्ञांचें लक्ष प्रफुल्लचंद्रांकडे लागलें. जो तो शास्त्रज्ञ त्यांची पाठ थोपटूं लागला व त्यांच्यावर स्तुतिसुमनें उधळूं लागला.

डॉ. रेंची आतां नामांकित शास्त्रज्ञांत गणना होऊं लागली. या शोधानंतर त्यांनीं अनेक औषधें व रसायनेंही शोधून काढली.

---

## ६ कारखानदार रे.

— १९ —

१८९२ सालीं म्हणजे कॉलेजमध्यें प्रोफेसर झाल्यानंतर अवघ्या चार वर्षांनीं डॉ. रे यांनीं "**केमिकल वर्क्स**" नांवाचा एक लहानसा कारखाना काढला. या चार वर्षांत त्यांनीं कसेंबसें ८०० रुपये जमविले होते; त्यामुळेंच हा कारखाना त्यांना काढतां आला.

नुसत्या एवढ्याशा रकमेंत हा कारखाना निघालाच नसता; पण डॉ. रे यांना त्यांच्या मित्रांचें अमोल सहाय्य झालें. **वेळीं उपयोगी पडतो तोच खरा मित्र.** असे मित्र मिळविण्याच्या मागें जर आपण लागलों, तर आपणांस आपल्या मनांतल्या किती तरी चांगल्या गोष्टी करतां येतील. पण असे मित्र मिळविण्याकरितां कोण खटपट करतो ? या मित्रांनीं डॉ. रेंकडून वेतनाची अपेक्षा केली नाहीं; कितीही काम पडलें तरी तें आनंदानें केलें व हा कारखाना मोठा प्रचंड करण्यांत आपलें सर्वस्व वेचलें.

आतांपर्यंत हा कारखाना डॉ. रे. यांचा वैयक्तिक होता. पण तो इतका मोठा होऊं लागला, कीं, त्यांना वाटलें तो सार्वजनिक करावा. १९०२ सालीं त्याचें 'विशिष्ट भांडवलवाली मंडळी' म्हणून रूपांतर झालें व आतां त्याचें नांव **'दि बेंगाल केमिकल ॲन्ड फार्मास्युटिक वर्क्स लि.'** असें ठेवण्यांत आलें. याकरितां दोन लाखांचें अधिकृत भांडवल निश्चित करण्यांत आलें. या दहा वर्षांत हा कारखाना चांगल्याच नांवारूपास आला होता. आतां त्यांत औषधाशिवाय इतरही हिंदुस्थानांत न होणाऱ्या वस्तू होऊं लागल्या. कांहीं रसायनांच्या बाबतींत आज इतका माल या कारखान्यांत तयार होतो, कीं, तितका आशियाखंडांतील कोठल्याही कारखान्यांत होऊं शकत नाहीं. तेथील मुख्य व्यवस्थापकास आतां सालिना ४०,००० रुपयांवर पगार मिळत आहे व आज या कारखान्याची किंमत लाखो रुपयांची झाली आहे.

– २० –

प्रफुल्लचंद्रांच्या मनांत असतें तर त्यांना टाटा-बिर्लासारखे श्रीमंत होतां आलें असतें; ते एक मोठे कारखानदार होऊं शकले असते; परंतु त्यांना बाळकडू स्वदेशप्रेमाचें होतें. समाज-सेवेचें होतें. मोठा कारखानदारच झाल्यावर लोकांचें कल्याण करण्याची बुद्धि राहिली



असती कीं नाहीं कोण जाणें ? म्हणूनच प्रफुल्लचंद्रांनीं हें पसंत केलें असावें. त्यांना त्यांच्यासारखेंच एकनिष्ठेनें देशाकरितां श्रम करणारे आणखी हजारों शास्त्रज्ञ हवे होते.

एकदां त्यांना बंगालच्या आमदार सभेकरितां उमेदवार म्हणून उभे राहण्यास सांगितलें; तेव्हां ते म्हणाले—'माझ्यासारखे ३० शास्त्रज्ञ हिंदुस्थानांत तयार झाले, म्हणजे मग मी उमेदवार म्हणून उभा राहीन!' एका युरोपीयनानें असे उद्गार काढले आहेत, कीं, 'जर महात्मा गांधी दोन रे उत्पन्न करूं शकते, तर एका वर्षांत हिंदुस्थानास स्वराज्य मिळतें.!'

'बंगाल केमिकल वर्क्स' स्थापन झाल्यावर प्रफुल्लचंद्रांनीं आपल्या वांट्याचे जे भाग होते त्यांचा एक ट्रस्ट केला व तो पैसा त्यांनीं आपल्या गांवीं एक हायस्कूल काढण्याकडे व तेथील लोकांच्या हिताकरितां इतर गोष्टी करण्याकडे लावून दिला.

## ७ मानसन्मान.

– २१ –

**मनुष्य स्वतःच्या कर्मानें मोठा होत असतो.** हें मोठेपण मिळविण्याकरितां त्याला 'लोखंडाचे चणे' खावे लागतात; भयंकर हाल सोसावे लागतात; सुखालें लाथाडावे लागते; आळस सोडावा लागतो; रात्रंदिवस मेहनत करावी लागते; विशेषतः, त्याच्याजवळ महत्वाकांक्षा, श्रद्धा व निश्चय यांचें बळ लागतें. यांच्या जोडीला चारित्र्य असल्यावर मग विचारायलाच नको.

अशा या माणसाला लोक पहिल्यानें हंसतात; त्याची टवाळी करतात; पण असा मनुष्य आपण होऊनच एकसारखा पुढें जात

असतो. मग त्याला कोणीहि अडवूं शकत नाहीं. लोक त्याची पूजा करूं लागतात; जे लोक शिव्या देत होते, तेच त्याचे भक्त बनतात. मानमतराब त्याच्यामागें लागतो; तो नाहीं म्हणत असतां ते त्याला चिकटतात.

प्रफुल्लचंद्रांचें अगदीं तस्सेंच झालें. नुसतें लोकच नाहीं तर सरकार सुद्धां त्यांच्या कामाकडे आदरानें पाहूं लागलें. १९११ सालीं सरकारनें त्यांना C. I. E. ( Companion of the Indian Empire )–'हिंदी साम्राज्याचा मित्र ' हा किताब बहाल केला.

– २२ –

आतां त्यांना निरनिराळ्या संस्थांकडून आमंत्रणें येऊं लागलीं. १९१७ सालीं कलकत्त्यास भरलेल्या राष्ट्रीय सामाजिक परिषदेचें अध्यक्ष, पद त्यांना देण्यांत आलें. यावरून ते सामाजिक कार्यें किती मनोभावें करीत असतील याची जाणीव होते. १९१८ सालीं मद्रास विश्वविद्यालयानें रसायन शास्त्रावर व्याख्यानें देण्यास त्यांस निमंत्रण दिलें. विश्वविद्यालयानें व्याख्यानांबद्दल मोबदला देऊं केला, तेव्हां त्यांनीं ती रक्कम विश्वविद्यालयास परत केली व तींतून दरवर्षी रसायनशास्त्राकरितां एक पारितोषिक दिलें जावें, म्हणून त्यांस सांगितलें. किती निःस्वार्थ मनोवृत्ति ! ज्ञानदानाबद्दल किती कळकळ !

१९१९ सालीं सरकारनें त्यास नाइट बनविलें; आतां ते नुसतें डॉ. प्रफुल्लचद्र रे राहिले नसून ' सर रे ' झाले. १९२० सालीं त्यांना–"इंडियन सायन्स कॉंग्रेस " चे अध्यक्ष नेमण्यांत आले. १९२३ सालीं अलिगड मुस्लिम युनिव्हर्सिटीनें त्यांस वार्षिक पदवीदान समारंभास सन्मान्य पाहुणे म्हणून बोलवून, हिंदु–मुसलमान वाद हा किती बाह्यात्कारी अर्थात् फोल आहे हें सिद्ध करून दिलें. १९२६ मध्यें म्हैसूर विद्यापीठानें त्यांस पदवीदान समारंभास आमंत्रण केलें. १९३४



सालीं लंडन केमिकल सोसायटीचे एक सन्मान्य सभासद म्हणून त्यांना दाखल करण्यांत आलें.

अशा प्रकारें प्रत्येकास आतां असें वाटूं लागलें, कीं, आपला व सर प्रफुल्लचंद्र रे यांचा कोणत्या ना कोणत्या प्रकारें संबंध यावा.

विद्वान् लोक सर्वत्र पूजले जाणारच !

---

# ८ प्रफुल्लचंद्रांची सामाजिक कामगिरी.

– २३ –

**ज्या** लोकांचा प्रत्येकाला स्वतःचा संसार असतो, पण तरीसुद्धां जे दुसऱ्यांच्या उपयोगीं पडतात, त्यांच्या त्या तसल्या कामगिरीला आपण सामाजिक कामगिरी म्हणतो. ज्यावेळीं स्वतःच्या पैशाचा, बुद्धीचा उपयोग दुसऱ्यांकरितां जास्त प्रमाणांत करून शिवाय जे इतरांकरितां अंगमेहनतही भरपूर करतात, त्या लोकांच्या ' सामाजिक कामगिरी 'ची जाणीव लोकांना जास्त प्रमाणांत होते; लोक यानें सामाजिक कामगिरी केली आहे असें बोलतात. ही कामगिरी निरनिराळ्या हेतूनें केली जाते. त्यांतल्या त्यांत आपणांस लोकांनीं मान द्यावा, आपली प्रतिष्ठा वाढावी, हा एक हेतु असतो; कांहीं लोक केवळ स्वतःला बरें वाटावें, या हेतूनेंच सामाजिक कार्य करतात; **कांहीं महात्मे मात्र प्राणिमात्रांचें कल्याण व्हावें हा उदात्त हेतू मनांत धरून काम करीत असतात.**

कित्येकांना वाटतें, आज आपण अस्पृश्य म्हटल्या जाणाऱ्या लोकांना समतेच्या दृष्टीनें वागवीत नाहीं; तेव्हां तसें करण्याकरितां ते आपला वेळ, पैसा व बुद्धि खर्च करतात. कित्येक लोकांना स्त्रियांचा प्रश्नच महत्वाचा वाटतो; कित्येक समाजाच्या आरोग्याकरितां झटतात,

कित्येक आंधळ्या पांगळ्या अपंगांकरितां मेहनत घेतात; अशा प्रकारें एक ना दोन कितीतरी निरनिराळीं कामें आहेत.

पण हीं कामें करणारे बहुधा स्वतःच्या संसाराकडे लागणारा वेळ, पैसा व बुद्धि खर्च करून राहिलेला भाग या कामाकरितां खर्च करितात. प्रफुल्लचंद्रांसारखे महात्मे मात्र, **'जग हेंच आपलें कुटुंब'** मानतात. त्यांचें प्रत्येक कृत्यच सामाजिक काम असते. त्यांना स्वतःचें कुटुंब नसल्यामुळें ते असें कोणतें काम स्वतःकरितां करून राहिलेला वेळ इतरांकरितां देणार? त्यांचें जीवन म्हणजे समाजाचेंच कार्य!

– २४ –

तरी सुद्धां बंगालमध्यें जेव्हां भयंकर दुष्काळ पडला, तेव्हां त्यांनीं जी कामागिरी केली, ती चिरस्मरणीय झाली आहे. त्यांनीं आपलें महत्त्वाचें काम म्हणजे प्रयोगाचें तें बाजूस सारले; व ते तडक दुष्काळी भागांत गेले. तिकडील परिस्थिती पाहिली व पैशाच्या मदतीकरितां त्यांनीं लोकांना विनंती केली. लगेच पैसा जमूं लागला. श्रीमंत बायांनीं आपलें जडजवाहीरही दिलें, रेशमी कपडे दिले, व गरीब बायांनीं देतां येण्याजोगे सोन्याचे दागिने काढून दिले; व घरांतले ठेवणीचे कपडे दिले. एका महिन्यांत तीन लाख रुपये जमले. नुसता पैसाच मिळाला नाहीं. शेंकडों तरुण माणसें स्वयंसेवक म्हणून धांवून आले. पीडित लोकांना मदत देण्याच्या कामीं कोणी जरा सुद्धां कसूर केली नाहीं.

पण हा सर्व प्रफुल्लबाबूंच्या स्वभावाचा व कीर्तीचा परिणाम. ते ज्याप्रमाणें उत्तम शिक्षक त्याप्रमाणें उत्तम व्यवस्था करणारेही होते.

---



## ९ लेखन.

– २५ –

कोणास वाटेल प्रफुल्लचंद्र हे शास्त्रज्ञ; सारा दिवस प्रयोग करीत बसणारे; त्यांना लेखनासारख्या गोष्टी करावयास वेळ कुठला? प्रयोग करण्यांत आयुष्य घालविणाऱ्या लोकांना दुसऱ्या कोणत्याही गोष्टींत गोडी नसतें हें आपणांस शास्त्रज्ञांचें चरित्र वाचित असतांना कळून येतें. परन्तु प्रफुल्लचंद्र निराळ्याच वृत्तीचे! आजारपणांत वडिलांची लायब्ररीची लायब्ररी वाचून काढणारे हे गृहस्थ! बी. एससी. चा अभ्यास एडिनबरोला चालू असतांच शास्त्रीयज्ञानाशीं कांहीं संबंध नाहीं असे एक उत्कृष्ट निबंध त्यांनीं लिहून काढला. "**बंडापूर्वीचें व नंतरचें हिंदुस्थान**" हें पुस्तक इतकें प्रभावी ठरलें, कीं, त्याची स्तुति प्रसिद्ध प्रोफेसर्स, नामांकित पत्रपंडित व पार्लमेन्टचे सुप्रसिद्ध सभासद जॉन ब्राइट यासारख्यांनीं केली.

नंतर १९०२ सालीं त्यांनीं "**हिंदी रसायन शास्त्राचा इतिहास**" हा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ तयार करण्याकरितां त्यांना १९ वर्षें अतोनात मेहनत घ्यावी लागली. आपला रिकामा वेळ सर्व माहिती मिळविण्यांत घालवावा लागला. पण हें पुस्तक इतकें लोकप्रिय झालें, कीं, अगदीं थोड्या अवधींत त्याच्या २।३ आवृत्या निघाल्या. या पुस्तकाबद्दल फ्रेंच व जर्मन शास्त्रज्ञांनीं फारच चांगले उद्गार काढले.

नंतर प्रफुल्लचंद्रांनीं–"**एका बंगाली रसायन शास्त्रज्ञाचें चरित्र व त्याचे अनुभव**", त्याचप्रमाणें "**वाङ्मयांत शास्त्रीय ज्ञानाचें स्थान**" हीं पुस्तकें लिहिलीं. याशिवाय त्यांनीं किती तरी लेख निरनिराळ्या मासिकांतून प्रसिद्ध केले आहेत. आपल्या लिखाणानें त्यांनीं इतकें मात्र सिद्ध करून दाखविलें आहे, कीं, "शास्त्रज्ञ उत्तम प्रकारचें वाङ्मयही तयार करूं शकतो."

# १० राजकीय, सामाजिक व शैक्षणिक मतें.

– २६ –

प्रफुल्लचंद्रांची राजकीय मतें लक्षांत ठेवण्याजोगीं आहेत. स्वत शास्त्रज्ञ; त्यांचा सर्व वेळ प्रयोग करण्यांत जावयाचा; त्यांना कुठें राजकीय विषयांवर विचार करण्याला वेळ? पण प्रफुल्लबाबूंनीं यावर खोल विचार केला होता, हें त्यांचें चरित्र पहिल्यानें आपणांस कळून येईल

पहिल्यानें त्यांनीं खादी परिधान करून असें दाखविलें, कीं, आपला पैसान् पैसा गरीबांच्या पोषणार्थ गेला पाहिजे. त्यांना मँचेस्टरहून आलेले तलम कपडे नसते कां घालतां आले? पण त्यांनीं शेवटपर्यंत खादी वापरली.

त्यांना वाटे, **"प्रयोग मागाहून होऊं शकतील; उद्योग-धंदे थांबूं शकतील; पण स्वराज्य थांबूं शकणार नाहीं. 'स्वराज्य' पहिलें; बाकीच्या गोष्टी मागाहून!"** पण त्यांना कोणी म्हटलें, कीं: 'बाबु, तुम्ही हे प्रयोग करतां! तें सोडून देऊन राजकारणांत कां पडत नाहीं?' त्याला त्यांचें उत्तर असे, "स्वराज्याकरितां प्रयत्न करणारे असंख्य लोक आहेत; शास्त्रीय ज्ञान घेऊन पुढील मोठ्या उद्योग धंद्यांच पाया आपणांस आतांच तयार करून ठेवला पाहिजे; बाहेरील शास्त्रज्ञ आणून आपला उद्योगधंदा कधींच चांगल्या प्रकारें वाढूं शकणार नाहीं; आपलेच शास्त्रज्ञ पाहिजेत. उद्योगधंदे काढून गरीबांना भरपूर पगार देतां येईल; त्यामुळें त्यांना अन्नवस्त्र मिळेल; हिंदुस्थानचें दारिद्र्य दूर होईल.—माझ्यासारखे जर तीस शास्त्रज्ञ आज तयार होतील, तर मी प्रयोग करण्याचें सोडून देईन; मी राजकारणांत शिरेन!"

**'स्वराज्य प्राप्त करून घेण्याला हिंदु-स्पृश्य व अस्पृश्य-त्याचप्रमाणें मुसलमान बांधव यांनीं एक झाले पाहिजे,'** असें त्यांचें मत असे. "हिंदुस्थान देश पुढें आला पाहिजे; तेथील लोक



उद्योगी झाले पाहिजे; त्यांनीं पुष्कळ प्रकारचे उद्योगधंदे काढले पाहिजेत; व हिंदुस्थानांतलें दारिद्र्य नाहींसें झालें पाहिजे." या विचारांवर आधारलेलीं त्यांचीं राजकीय मतें होतीं.

– २७ –

ते कोणत्याही एका विशिष्ट राजकीय गटांतील नव्हते; किंवा त्यांनीं विशिष्ट प्रकारचीं राजकीय मतेंही प्रतिपादिलीं नव्हतीं; तरी ते शंभर टक्के राष्ट्रीय वृत्तीचे होते. त्यांचा पोषाख शुद्ध खादीचा; रहाणी ऋषीसारखी साधी; विचार व आचार अत्यंत शुद्ध व थोर. खादी वापरण्यावर त्यांचा विशेष भर असे.

खादी वापरल्यानें हिंदुस्थानचें अत्यंत कल्याण होईल, असा त्यांचा समज होता; एक कोटी शेतकऱ्यांनीं दररोज दोन तास प्रमाणें नुसतें सूत काढलें तरी बंगालचें उत्पन्न दर वर्षास २४ कोटींनीं वाढेल, हें त्यांनीं आंकड्यांच्या सहाय्यानें सिद्ध केलें होतें. तितक्या किंमतीचें, अन्न दिलेंसें होईल; अर्धपोटी राहणाऱ्या लोकांना हीं काय कमी मदत? ही एका प्रांताची गोष्ट; तीही दररोज नुसतें दोन तास काम करण्याबद्दल. त्यावर जर विशेष जोर दिला, व हिंदुस्थानच्या सर्व प्रांतांत जर हीं गोष्ट होऊं लागली, तर किती बरें फायदा होईल? शिवाय चरख्यावर सूत काढण्यानें मनुष्य आळशी राहणार नाहीं. स्वतः शेतकऱ्याशिवाय रंगारी, सुतार, विणकर वगैरेंनाही भरपूर काम मिळेल.

– २८ –

प्रफुल्लचंद्रांचें आयुष्य 'गुरु'—'आचार्य' म्हणून गेलेलें. ते एक जन्मजात उच्च प्रकारचे शिक्षक होते; त्यांनीं स्वतःच्या पैशानें आपल्या गांवीं एक हायस्कूल काढलें होतें; व विद्यार्थ्यांस विद्यादान करण्यांत त्यांचें आयुष्य खर्च झालेलें. तेव्हां त्यांचें शिक्षणासंबंधानें विचार विशेष मननीय असले पाहिजेत यांत शंका नाहीं.

'प्रत्येकाचें शिक्षण आपापल्या **स्वतःच्या भाषेंत झालें पाहिजे'**, असें त्यांचें मत असे व हें त्यांनीं म्हैसूर विश्वविद्यालयाच्या पदवीदान समारंभाचे वेळीं स्पष्ट तसें बोलूनही दाखविलें. स्वभाषेंत शिक्षण देण्याची पद्धत आपणांत नसल्यानें हिंदुस्थानांत जितके लोक शिकलेले असावयास पाहिजेत तितके नाहींत असें ते म्हणत. **मुलांनीं स्वतःचीं कामें स्वतः करावींत**, असें त्यांना वाटे.

– २९ –

प्रफुल्लचंद्रांचीं सामाजिक मतें वडिलांच्या शिकवणूकीमुळें पहिल्यापासूनच पुढारलेलीं होतीं. त्यांना जातीजातींतील वैमनस्य, दुजाभाव व ढोंगी सोंवळेंपण सहन होत नसे. एका जातीनें दुसऱ्या जातीस कमी लेखावें, एकानें आपणांस श्रेष्ठ म्हणवून घ्यावें व दुसऱ्यास हीन लेखावें, ह्या कल्पनाच त्यांना आवडत नसत. **'जातीजातींचें बंड मोडून अखंड हिंदुस्थान एका जातीचाच झाला पाहिजे'** असें त्यांचें मत होतें. या मताचा उच्चार त्यांनीं पुष्कळ ठिकाणीं जाहीररीत्या केला होता. विशेषतः १९२९ सालीं तर त्यांनीं या बाबतींत फारच जोराची घोषणा केली व हिंदूंना जातींचें बंड मोडण्यास त्यांनीं सांगितलें.

प्रफुल्लचंद्र यांची अस्पृश्योद्धाराबद्दलची मतेंही फारच जहाल होतीं. **'अस्पृश्यता ही हिंदुधर्मास लागलेली कीड आहे'** असें त्यांना वाटे. ही अस्पृश्यता कायमची नाहींशी करा, असें त्यांनीं १९१७ सालीं कलकत्त्यास भरलेल्या राष्ट्रीय सामाजिक परिषदेचे वेळीं अध्यक्षपदावरून सांगितलें.

ते म्हणत,'अस्पृश्यतेसारखे हिंदुस्थानास द्विधा करणारे दोष आहेत; म्हणूनच जपानला जें १८७१ सालीं करतां आलें, तें हिंदुस्थानास अद्याप करतां येत नाहीं.' त्यांना विशेष वाईट वाटत असे तें यामुळें, कीं, हिंदुस्थानांत श्रेष्ठ म्हणविणारे कांहीं लोक बाहेर वाटेल तसें खाऊं नये तें



खातात, पिऊं नये तें पितात; त्यांचे वर्तन व विचार अत्यंत पापी असतात; असें असून घरांत अत्यंत सोंवळेपणानें मात्र ते वागतात; महाराची सांवली अंगावर पडली असतांना सुद्धां त्यांना स्नान करण्याची इच्छा होते.'

'हिंदु–मुसलमानांनीं एकोप्यानें राहण्यांतच हिंदुस्थानाचा फायदा आहे' असेंही त्यांचें ठाम मत होतें व हेंच मत त्यांनीं अलिगड मुस्लिम युनिव्हर्सिटीच्या पदवीदान समारंभाचे वेळीं सांगितलें.

## १२ प्रफुल्लचंद्र व त्यांचे विद्यार्थी.

– ३० –

नामांकित शिक्षक व शिक्षणसंस्था याकरितां हिंदुस्थान प्राचीन कालापासून प्रसिद्ध आहे. हिंदुस्थानांतील शिक्षणसंस्थेंत ज्यावेळीं आजच्या सुखसोई नव्हत्या, त्याकाळीं यूरोपिय, चीन व इतर राष्ट्रांतून शिक्षण घेण्याकरितां शेंकडों विद्यार्थी येत. या विद्यार्थ्यांना हजारों मैल चालून जंगलांतील संकटांना तोंड देत यावें लागे; पण जातांना हिंदुस्थानच्या कीर्तीचा सुवास सर्वत्र ते पसरवीत. ( हुएनत्संग हा चिनी प्रवासी शिकण्याकरितांच हिंदुस्थानांत आला होता. )

पण पुढें आपल्या शिक्षणसंस्था खालावत गेल्या; तसें होण्याचें कारण इकडील शिक्षक कमी दर्जाचे होऊं लागले. शिक्षकच निकृष्ट प्रतीचें होऊं लागल्यावर शिक्षणसंस्था उत्तम प्रकारच्या कशा बनणार ?

प्रफुल्लचंद्रांनीं पूर्वकालीन ऋषीप्रमाणें शिक्षकांची नवीन प्रथा पुनः सुरू केली; व त्याचा परिणाम केवढा प्रभावी झाला आहे हें प्रफुल्लचंद्रांच्या चरित्रावरून आपणांस दिसून येते.

आधीं जन्मजात उत्तम शिक्षक; त्यांतून देशहित करण्याची तीव्र तळमळ; अखंड वाचनाची हौस; व विद्यार्थ्यांबद्दल आस्था; त्यांतून योग्य

मार्गदर्शन करण्याची हातोटी; या सर्व गुणांमुळेंच 'डॉ. रे' किंवा '**सर रे**' हे त्या नांवानें प्रसिद्ध न राहतां '**आचार्य रे**' या नांवानें प्रसिद्ध झाले आहेत.

असे शिक्षक सर्व हिंदुस्थानांत जर शेंपन्नास उत्पन्न होतील तर स्वराज्य अगदीं जवळ येईल यांत शंका नाहीं.

आजची निःसत्व गुलामी शिक्षण–पद्धति जोंपर्यंत आहे, तोंपर्यंत हिंदुस्थानचें स्वातंत्र्य खात्रीनें दुरावेल.

---

## १२ प्रफुल्लचंद्रांसंबंधानें लोकमत.

– ३१ –

आचरण शुद्ध, स्वार्थावर पाणी सोडण्याची तयारी, विनयशील वागणें, व या सर्वांत ज्ञानाची भर या गोष्टी जर एकाद्यांत असतील, तर त्याचे शत्रूही त्याची स्तुतिस्तोत्रें गातील; त्याच्यावर स्तुतिसुमनें उधळतील; मग मित्रांची तर गोष्टच नको.

जनक, राम, कृष्ण, बुद्ध, खिस्त, महंमद वगैरे जे लोक चिरंजीव झाले आहेत, त्याचें कारण हेंच. या गुणांपैकीं एकेक सुद्धां माणसाला उच्चत्व प्राप्त करून देण्यास समर्थ आहे; मग सर्वांचा समुच्चय माणसास किती श्रेष्ठत्व प्राप्त करून देईल हें सांगावयासच नको.

प्रफुल्लचंद्रांमध्यें वरील सर्वच गुण होते; त्यामुळेंच ते सर्वांना प्रिय व पूज्य झाले. रविंन्द्रनाथ टागोर, महात्मा गांधी यांना सुद्धां त्यांच्या-बद्दल फार आदर असे.

'प्रफुल्लचंद्र हे तरुणांचे गुरु, त्यांच्यांत चैतन्य उत्पन्न करणारे व त्यांच्यापुढें उच्चतम ध्येय ठेवणारे असे शिक्षक आहेत' असें टागोरांना



वाटे. रविन्द्रनाथ टागोरांनीं त्यांच्याबद्दल पुढीलप्रमाणें उद्गार काढले आहेत. " उपनिषदांत म्हटलें आहे. '**मी पुष्कळ होईन;**' आचार्य रे हे आपल्या विद्यार्थ्यांच्याद्वारें '**पुष्कळ**' झाले आहेत. त्यांनीं सर्व विद्यार्थ्यांच्या हृदयांत स्वतःला स्थान प्राप्त करून घेतलें आहे."

प्रफुल्लचंद्रांनीं बंगाल्यांतील महापुराच्या वेळीं १९२२ सालीं केलेल्या कामगिरीबद्दल इंग्लंडमधील प्रसिद्ध पत्र जें "मँचेस्टर गार्डियन" त्याच्या खास बातमीदारानें, त्यांनीं केलेल्या कार्याचें वर्णन करून पुढें म्हटलें आहे, " त्यांची हांक ऐकतांच लोक द्रव्य घेऊन धांवत आले. शेंकडों तरुण माणसें स्वयंसेवक म्हणून पुढें सरसावलीं; हा सर्व प्रफुल्ल-बाबूंच्या स्वभावाचा व कीर्तीचा परिणाम. ते ज्याप्रमाणें उत्तम शिक्षक त्याप्रमाणेंच उत्तम व्यवस्था लावणारे आहेत."

एका युरोपियन गृहस्थानें तर असे उद्गार काढले, कीं, " महात्मा गांधी जर दोन 'रे' उत्पन्न करूं शकते, तर हिंदुस्थानास एका वर्षांत स्वराज्य प्राप्त होऊं शकतें."

---

## १३ समारोप.

– ३२ –

प्रफुल्लचंद्रांचें चरित्र वाचून आपण काय शिकलों यांचा खोल विचार करावयास पाहिजे.

**आचार्य रे हे स्वतःच्या पायावर उभे राहिले.** शिक्षणा-करितां लागणाऱ्या पैशाकरितां ते वडिलांवर अवलंबून राहिले नाहींत. **त्यांच्या अंगांत हिंमत होती, बुद्धि होती. महत्वाकांक्षा होती.** यामुळें त्यांनीं शिष्यवृत्त्या मिळविल्या व त्यांच्या जोरावर त्यांनीं परदेशांत शिक्षण घेतलें. तेथेंही त्यांनीं शिष्यवृत्त्या मिळविल्या व लौकिक कमा-

वला. ज्या परदेशाच्या विश्वविद्यालयांत त्यांनीं प्रवेश केला, तेथेंच ते रासायनिक संस्थेचे उपाध्यक्ष झाले.

**प्रफुल्लचंद्र यांच्यापुढें 'ध्येय' असे. देशाकरितां कांहीं तरी केलें पाहिजे असें त्यांनीं अगदीं लहापणापासून ठरविलें होतें.** ते "नुसता पुस्तकांतला किडा" न होतां, शाळा कॉलेजमध्यें शिकत असतांनाच समाजांत वावरूं लागले. स्वतःच्या सुखाची पर्वा न करितां दुसऱ्यांकरितां ते श्रम घेऊं लागले. आपण पुष्कळ शिकावें व हिंदुस्थानांत मोठमोठे कारखाने काढावेत, असें त्यांना मनापासून वाटे. कारखाने स्थापल्यानें आपले लोक उपाशी मरणार नाहींत व त्यांना काम मिळेल अशी त्यांना खात्री होती.

**प्रफुल्लचंद्रांचें राहणें अगदींच साधें असें.** पहिल्यापासून ते खादी वापरीत. याहून साधा असा दुसरा पोषाख ते कोणता? **ते मनाचेही अत्यंत निर्मळ व थोर. वागणेंही साधें व विचारही थोर!**

**प्रफुल्लचंद्र आपला वेळ फुकट कधींही दवडत नसत.** त्यांनीं रिकाम्यावेळीं लिहिलेलें पुस्तक फारच महत्वाचें ठरलें. त्यांचें वाचन व लेखन अखंड चालू असे. **'वेळेचा सदुपयोग न केल्यानें आयुष्य फुकट जातें; रिकाम्या वेळींहि माणसानें कांहीं ना कांहीं कामगिरी करावी; नाहीं तर मनुष्य आळशी होतो'** असें त्यांचें मत असे. वयाच्या पन्नासाव्या वर्षानंतरही त्यांनीं उत्कृष्ट कामगिरी केली आहे. 'मरणाच्या शेवटच्या घटकेपर्यंत माणसानें एकसारखें काम केलें पाहिजे. असें ते म्हणत.

**प्रफुल्लचंद्र दुसऱ्याच्या शक्य तितक्या उपयोगी पडत.** विद्यार्थ्यांना तर त्यांचें घर मोकळे असे. त्यांना पैशाचीही मदत ते नेहमीं करीत.

प्रफुल्लचंद्रांनीं जे शोध केले त्यामुळें हिंदुस्थानचें नांव जगांत झळकलें. युरोपांत जो शोध लावण्यास शतकेच्या शतकें गेलीं, तो शोध त्यांनीं लावला.



प्रफुल्लचंद्राची राजकीय मतें लक्षांत ठेवण्याजोगीं आहेत. हिंदु-मुसलमानांची एकी पाहिजे होती; जातींजातींतील भेद त्यांना नको होते. अस्पृश्यता त्यांना कायमची नष्ट व्हावी अशी इच्छा होती. उद्योगधंदे सुरूं करून हिंदुस्थानचें वैभव वाढेल अशी त्यांना आशा होती. प्रत्येकानें चरख्यावर सूत काढावें असें त्यांना वाटे. त्यामुळें निदान मनुष्य आळशी बनणार नाहीं. प्रफुल्लचंद्रांच्यामतें शाळा कॉलेजांतील शिक्षण स्वतःच्या भाषेंतूनच द्यावयास पाहिजे.

अशाप्रकारें हिंदुस्थानांतील एक आदर्श ऋषितुल्य शिक्षक, नामांकित शास्त्रज्ञ, समाजसेवक कारखानदार प्रफुल्लचंद्र, वयाच्या ८३ व्या वर्षी, (जून १६ रोजीं सायंकाळीं ६०-३० वाजतां) कालवश झालें. अन् ते सुद्धां कॉलेजच्या आवारांतच!

**पण एक रे शेंकडों विद्यार्थ्यांच्या हृदयांत आज जिवंत झाले आहेत; हे शेंकडो रे प्रफुल्लचंद्रांचेंच काम चालूं ठेऊन हिंदुस्थान देशाचें दारिद्र्य दूर करतील अशी आशा कां करूं नये?**

★

**अमर ज्योति वाङ्मय**

**'माणसाचे शेंपूट'**

[ शास्त्रीय-वाङ्मय ]

**जरूर जरूर वाचा !**

## -- चांचपणी --

१ शुक्राप्रमाणें ज्यांचें तेज अत्यंत तेजस्वी आहे असे हिंदुस्थानांतील कांहीं थोर पुरुष तुम्हांस माहीत असल्यास त्यांचीं नांवें सांगा. प्रत्येकाबद्दल थोडी माहिती सांगा. प्रत्येकाची विशिष्ट कामगिरी सांगा.

२ बंगालला थोर लोकांची जन्मभूमि कां म्हटलें आहे ?

३ प्रफुल्लचंद्रांचें आरंभीचें शिक्षण कोणत्या वातावरणांत झालें ?

४ प्रफुल्लचंद्रांनीं आजारीपणातील वेळेचा उपयोग कसा केला ?

५ बेंजामीन फ्रँकलीन वगैरेंच्या चरित्रांपासून प्रफुल्लचंद्र काय शिकले ?

६ वडिलांकडून पैशाची मदत नसतांनाही प्रफुल्लचंद्र विलायतला जाऊन तेथील अभ्यास पुरा कसें करूं शकले ?

७ कोणकोणत्या गोष्टींमुळें प्रफुल्लचंद्रांची कीर्ति युरोपमध्यें पसरली ?

८ प्रफुल्लंद्रांच्या औदार्याचीं कांहीं उदाहरणें सांगा. प्रफुल्लचंद्र व इतर कारखानदार यांत तुम्हांस कोणता फरक दिसून येतो ?

९ प्रफुल्लचंद्रांच्या कामगिरीबद्दल त्यांचा सन्मान कोणत्या प्रकारें करण्यांत आला ?

१० प्रफुल्लचंद्रांनीं केलेल्या विशेष उल्लेखनीय कामगिरींबद्दल माहिती द्या.

११ प्रफुल्लचंद्रांनीं लिहिलेल्या काहीं ग्रंथांचीं नांवें सांगा.

१२ प्रफुल्लचंद्रांचीं कांहीं सामाजिक व शिक्षणविषयक मतें सांगा.

१३ प्रफुल्लचंद्र इतक्या थोर पदवीस चढण्यास कोणतीं कारणें झालीं ?

*

अमर ज्योति वाङ्मय
गीत-ज्योती
[ किशोर-किशोरींचा अभिनव सचित्र काव्य-संग्रह ]



# आचार्य रे यांच्या आयुष्यांतील ठळक गोष्टींचे सन.

१८६१ प्रफुल्लचंद्रांचा जन्म.

१८७० कलकत्ता हेअर स्कूलमध्यें प्रवेश.

१८७४ प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें शाळा सोडली; कलकत्त्याहून आपल्या खेडेगावीं आले.

१८७६ प्रकृति बरी झाल्यावर कलकत्त्यास पुन: प्रयाण; आल्बर्ट स्कूलमध्यें दाखल.

१८७९ प्रवेश परीक्षा पास.

१८८२ गिल्क्राइस्ट स्कॉलरशिप मिळविली. युरोपांत शिक्षणाकरित गेले. एडिनबरो विश्वविद्यालयांत प्रवेश.

१८८८ डॉ. एस्. सी. पदवी मिळाली. दोन स्कॉलर्शिप्स मिळविल्या.

१८८९ हिंदुस्थानांत परत; कलकत्ता प्रेसिडेन्सी कॉलेजांत नोकरी.

१८९२ खासगी रसायनाचा कारखाना काढला.

१८९६ ‘ मर्क्युरस् नाइट्रेट ’ चा शोध; विश्वप्रसिद्धी.

१९०२ “ हिंदी रसायनशास्त्राचा इतिहास ” लिहिला.

१९०४ युरोपांतील रासायनिक प्रयोगशाळा पाहण्यास त्यांना बंगाल सरकारनें पाठविलें.

१९११ सी. आय्. ई. हा किताब मिळाला.

१९१६ सरकारी कॉलेजचा राजिनामा.

१९१७ कलकत्त्यास भरलेल्या राष्ट्रीय सामाजिक परिषदेचे अध्यक्ष.

१९१८ मद्रास विश्वविद्यालयाकडून रसायन शास्त्रावर व्याख्यानें देण्यास आमंत्रण.

| | |
|---|---|
| १९१९ | ' सर ' हा श्रेष्ठ किताब सरकारनें दिला. |
| १९२० | इंडियन सायन्स कॉंग्रेसचे अध्यक्ष. |
| १९२२ | उत्तर बंगालमध्यें भयंकर पूर आला असतां त्यांनीं केलेली कामगिरी. |
| १९२३ | अलिगड मुस्लिम युनिव्हर्सिटीकडून पदवीदान समारंभास आमंत्रण. |
| १९२५ | जातिभेद नष्ट करून ऐक्य साधण्याबद्दल जाहीर घोषणा. |
| १८२६ | म्हैसूर विद्यापीठाकडून पदवीदान समारंभास आमंत्रण. |
| १९३२ | " एका बंगाली रसायन शास्त्राज्ञाचें चरित्र व त्यानें केलेले प्रयोग " हें आत्मचरित्र प्रसिद्ध केलें. |
| १९३४ | लंडन केमिकल सोसायटीचे सन्मान्य सभासद. |
| १९३६ | कलकत्ता युनिव्हर्सिटींत एमेरिटस् प्रोफेसर ऑफ केमिस्ट्री |
| १९४४ | मृत्यू. |

---

# अमर ज्योति वाङ्मय

[ स्थापना ५ डिसेंबर १९४३ ]

(१) ५ डिसेंबर १९४३ च्या आमच्या योजना-पत्रकांत जाहीर केल्याप्रमाणें, प्रस्तुत (' ज्योति-सामंत-स्मारक ') संस्थेचा, दरवर्षी दिवाळींत धनत्रयोदशीच्या दिवशीं, एकाच गटांत, लहान मोठीं विविध वाङ्मयाचीं सर्वांग-सुंदर पुष्पें प्रकाशित करण्याचा संकल्प, आज या पहिल्या गटाच्या रूपानें मूर्त स्वरूपांत येत आहे.

(२) उगवत्या-वाढत्या पिढीला आनंद-ज्ञान-दायक असें नव्या दृष्टीचें, पद्धतशीर, सात्विक-सोज्वल आदर्श वाङ्मय, तज्ञांकडून मुद्दाम लिहवून घेऊन उपलब्ध करून द्यावयाचें हा या स्मारक संस्थेचा मनोदय आहे. तो अधिक सुलभ व्हावा, म्हणून विषयपरत्वें ' मनोरंजक ' व ' ज्ञान ' असे आम्ही मुख्य दोन स्थूल विभाग कल्पिले आहेत. वयपरत्वें-१ ) ' शिशुश्रेणी ' ( वय वर्षें ७ पर्यंत ), ( २ ) बाल-श्रेणी ' ( वय वर्षें १२ पर्यंत, ) ( ३ ) 'किशोर श्रेणी ' ( वय वर्षें १४, ) व ( ४ ) 'कुमार-श्रेणी ' ( वय वर्षें १७ पर्यंत ) असे सर्वसाधारण चढते टप्पे ठरवले आहेत. आणि याच विषय-विभागांच्या व वयाच्या-टप्प्यांच्या स्थूल आराखड्याचा अधिक सूक्ष्म विचार करून त्यांत बसणाऱ्या सर्व प्रकारच्या विविध आकर्षक पुस्तकांचा दरवर्षी होणाऱ्या आमच्या असल्या प्रकाशनगटांत समावेश होईल, अशी काळजी घेण्याचा आम्ही प्रयत्न करणार आहों.

(३) या संस्थेच्या कार्यांत फायद्याची विशेष दृष्टी नसली तरी व्यवहार संभाळणें व त्या बाबतींत संभाळून पाऊल टाकणें भाग आहे. संस्थेला मिळणाऱ्या रसिकाश्रयावर व गुंतलेली रक्कम मोकळी होण्यावरच संस्थेचें प्रत्येक पुढील वर्षांचें कार्य मुख्यतः अवलंबून रहाणार. तेव्हां ( संस्थेला मिळणाऱ्या आश्रयाचा आगाऊ अंदाज येण्यासाठी ) आम्ही ' कायम ग्राहकत्वा 'ची योजना उपयुक्त म्हणून सुरू केली आहे. पुस्तकाची कितीही लहान आवृत्ती काढली तरी ग्राहकांना त्यांची प्रत प्रथम मिळेल. आणि ती पुन्हां सामान्य गिऱ्हाइकापेक्षां अधिक सवलतीनें मिळेल. शेवटीं हा प्रश्न सदिच्छा व सहकार्यावर अवलंबून असल्यामुळें फक्त मामुली चार

आणे प्रवेश फी घेऊन कोणत्याही मुलामुलीस आम्ही ग्राहकपटावर नोंदवून घेऊं. ग्राहकानें संस्थेतर्फे प्रसिद्ध होणारी **दरवर्षीचीं सर्वच प्रकाशनें विकत घेतलीं पाहिजेत, असा आमचा आग्रह राहणार नाहीं.** (घेतली तर तीं त्याला सवलतीनें मिळतीलच.)

मात्र **कोणतीहि गटांतील पांच रुपयाची पुस्तकें नक्त रुपये चार किंमतीस त्याला मिळतील,** तीं पुस्तकें दरवर्षी त्यानें घेतलीं, तरच त्याचें ग्राहकत्व कायम राहून पुढेंहि त्याला सवलत मिळत राहील. **पुस्तकाची किंमत परिस्थितीनुरूप परवडेल तितकी कमीतकमी ठेवणार आहोंत. पण तरीही सामान्य गिऱ्हाईकापेक्षां अधिक सवलत कायम ग्राहकासच मिळणार आहे.** तेव्हां या योजनेचा फायदा घेण्याची इच्छा असणाऱ्या पालकांनीं संस्थेशीं याप्रकारें जरूर सहकार्य करावें.

प्रथम वर्षाची विशेष फायद्याची **'परिचय सवलत--'**

**या वर्षाच्या एकूण बारा पुष्पांची किंमत रु. ५-१३-० होतें.** चार ओण प्रवेश फी भरल्यावर **हींच सर्वांगसुंदर पुस्तकें ग्राहकांना रु. ४-१३-० स पडतील.** पालकांचा नवीन परिचय व्हावा म्हणून व संस्थेच्या ग्राहक योजनेला मूर्त स्वरूप यावें म्हणून (रु. ४-१३-०+०-४-०=५-१-०) **अशीं एकूण नक्त रु. ५-१-० चीं हीं पुस्तकें, रु. ४-१२-० मनीऑर्डरीनें पाठविल्यास, आमच्या खर्चानें अनरजिस्टर्ड बुकपोस्टानें आमच्या या नवपरिचित ग्राहकाला पाठवून त्याचें नांवही ग्राहकपटावर नोंदवून घेऊं.**

(४) **'अमर-ज्योति वाङ्मया'**ला आश्रय मिळवून देऊन, उत्तम लेखन साहाय्य करून, उपयुक्त व आवश्यक अशा नवीन प्रकाशनाबाबत कल्पना सुचवून वगैरे हस्ते परहस्तें जी. जी. सक्रीय मदत केली जाईल त्याबद्दल त्या त्या आस्थेवाईक हितचिंतकांनी संस्था सदैव ऋणीच राहील.

विनम्र–**चालक**

'अमर ज्योति वाङ्मय'

चालकः—**सौ. स्नेहल सामंत,** पी. ए.

मुख्य संपादकः—**श्री. रघुवीर सामंत,** बी. ए. बी. टी.

कचेरीः—अमर ज्योति प्रकाशन, १४ बी. हरजीवन एस्टेट, दादर.

तथापि, दरवर्षी होणाऱ्या या **'दिपावली प्रकाशनां'**च्या गटाची व्याप्ती सर्व विभागांपर्यंत व सर्व टप्यां-श्रेणींपर्यंत पोहोंचणें, हें संस्थेच्या आदल्या वर्षीच्या प्रकाशनाला मिळणाऱ्या रसिकाश्रयावर, संस्थेच्या स्थिर आर्थिक परिस्थितीवर व त्या त्या वेळच्या भोंवतालच्या अनुकूल प्रतिकूल परिस्थितीवरच अवलंबून रहाणार, हें अर्थातूच लक्ष्यांत घेतलें पाहिजे.—तरी पण होतां होईतों **कमींत कमी बारा ते अठरा पुष्पांची गुंफण दर दिवाळींत संस्था करूं शकेल** अशी आमची आज तरी इछा-आकांक्षा आहे. आम्हाला तशी उमेद आहे.

(४) या संस्थेच्या कार्यांत फायद्याची विशेष दृष्टी नसली तरी व्यवहार संभाळणें व त्या बाबतींत संभाळून पाऊल टाकणें भाग आहे. **संस्थेला मिळणाऱ्या रसिकाश्रयावर व गुंतलेली रक्कम मोकळी होण्यावरच संस्थेचें प्रत्येक पुढील वर्षाचें कार्य मुख्यतः अवलंबून रहाणार.** तेव्हां (संस्थेला मिळणाऱ्या आश्रयाचा आगाऊ अंदाज येण्यासाठी) **आम्ही 'कायम ग्राहकत्वा'ची योजना उपयुक्त म्हणून मुक्रर केली आहे.** पुस्तकाची कितीही लहान आवृत्ती काढली तरी **ग्राहकांना त्यांची प्रत प्रथम मिळेल.** आणि ती पुन्हां **सामान्य गिऱ्हाइकापेक्षां अधिक सवलतीनें मिळेल.** शेवटीं हा प्रश्न सदिच्छा व सहकार्यावर अवलंबून असल्यामुळें **फक्त मामुली चार आणे प्रवेश फी** घेऊन कोणत्याही मुलामुलीस आम्ही ग्राहकपटावर नोंदवून घेऊं. ग्राहकानें संस्थेतर्फे प्रसिद्ध होणारी **दरवर्षीचीं सर्वच प्रकाशनें विकत घेतलीं पाहिजेत, असा आमचा आग्रह राहणार नाहीं.** (घेतली तर तीं त्याला सवलतीनें मिळतीलच.)

मात्र **कोणतीहि गटांतील पांच रुपयाची पुस्तकें नक्त रुपये चार किंमतीस त्याला मिळतील,** तीं पुस्तकें दरवर्षी त्यानें घेतलीं, तरच त्याचें ग्राहकत्व कायम राहून पुढेंहि त्याला सवलत मिळत राहील. **पुस्तकाची किंमत परिस्थितीनुरूप परवडेल तितकी कमीतकमी ठेवणार आहोंत. पण तरीही सामान्य गिऱ्हाईकापेक्षां अधिक सवलत कायम ग्राहकासच मिळणार आहे.** **अमर-ज्योति वाङ्मया**'ला आश्रय मिळवून देऊन, उत्तम लेखन साहाय्य करून, उपयुक्त व आवश्यक अशा नवीन प्रकाशनाबाबत कल्पना सुचवून वगैरे हस्ते परहस्तें जी. जी. सक्रीय मदत केली जाईल त्याबद्दल त्या त्या आस्थेवाईक हितचिंतकांनी संस्था सदैव ऋणीच राहील.

विनम्र–**चालक**

रघुवीर सामंत संपादित

# अमर

## — ज्योति वाङ्मय —

* नव्या दृष्टीचीं, नव्या पद्धतीचीं, हीं नवीं विविध पुस्तकें आपल्या मुलामुलींच्या हातीं द्या !—
* तीं त्यांची करमणूक करतीलच; पण त्याबरोबरच त्यांना अधिक रसिक बनवतील !—
* हीं व असलीं पद्धतशीर पुस्तकें अव्याहत प्रकाशित करण्यास साहाय्य करण्यासाठीं, या प्रकाशन-संस्थेचे, फक्त चार आणे भरून व रु. चारचीं सवलतीनें पुस्तकें घेऊन कायम ग्राहक व्हा. ग्राहकांना दर दिवाळींत प्रसिद्ध होणारीं (सर्व अगर रु. ४ चीं) पुस्तकें विशेष सवलतीनें मिळत जातील.

### ❀ प्रथम वर्षांतील ❀

१२—दीपावली-प्रकाशनें—१२

[ मनोरंजन विभाग ]

**I न्याय-चातुर्य-कथा**
( किशोर श्रेणी )
१ मडक्यांतला न्याय आणि इतर कथा
२ नशिबाची परीक्षा आणि इतर कथा
३ जलदेवतेचा न्याय आणि इतर कथा
४ अजिंक्य पंडित आणि इतर कथा

**II सत्यकथा—**
( कुमार श्रेणी )
१ कड्यावरील गाडी आणि इतर कथा
२ शूरांचा गांव आणि इतर कथा

**III अभिनय-गीतें**
( किशोर श्रेणी )
१ गीत ज्योती

**IV दीर्घ-कथा**
१ कांहीं कमळें

**V मोठ्यांच्या छोट्या गोष्टी**
( कुमार श्रेणी )
१ चार वीर
२ ‘प्रफुल्लचंद्र’

[ ज्ञान विभाग ]

**VI शास्त्रीय कुतूहल.** (कुमार श्रेणी)
१ माणसाचें शेंपूट.

**VII वाङ्मयीन चर्चा.** (कुमार श्रेणी)
१ ‘मी लेखक होणार.’

खानविलकर लिथो प्रेस; मुंबई २.